# १. महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) अधिनियम, १९५६

**शासकीय अधिसूचना, गृह विभाग, क्र. ९०८७/५ – ११ डी, दि. २७ एप्रिल, १९५६ (मुंबई राजपत्र भाग चार ब)**

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ (सन १९५१ चा मुंबई २२) याच्या कलम २५ चे पोटकलम (२) चा खंड (क) आणि कलम ५ (ब) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मुंबई सरकार, मुंबई राज्यातील पोलीस निरीक्षकाच्या दर्जाच्या आणि त्यापेक्षा कमी दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या शिक्षांचे नियंत्रण करणारे आणि त्याबाबतीतल्या अपिलांबाबतचे पुढील अधिनियम करीत आहे :

१. (१) या नियमांना महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम, १९५६ असे म्हणावे.

(१-अ) त्यांचा संपूर्ण मुंबई राज्यावर विस्तार असेल.

(२) ते मुंबई राज्यातील निरीक्षकाच्या आणि त्याच्या खालच्या दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांना रेल्वे पोलीस अधिकाऱ्यासह (यात यापुढे पोलीस अधिकारी म्हणून निर्देशिलेल्या) लागू असतील.

२. हे नियम ज्यांना लागू आहेत अशा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यांना या नियमांच्या तरतुदींनुसार असेल ते खेरीज करून अन्य प्रकारे विभागीयरीत्या शिक्षा करण्यात येणार नाही.

३. (१) त्या त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यास बाधा न येता, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याच्या बाबतीत पुढील शिक्षा करता येईल :

(अ-२) निलंबन;

(एक) दर्जा, श्रेणी किंवा वेतन यांत घट करणे किंवा कोणत्याही प्राविण्य पदावरून दूर करणे किंवा कोणत्याही विशेष वित्तलब्धी काढून घेणे;

(एक-अ) सक्तीची सेवानिवृत्ती;

(दोन) पोलीस विभागाखेरीज इतर विभागांमध्ये भविष्यकाळात नोकरी करण्यास अनर्ह ठरणार नाही अशाप्रकारे सेवेतून दूर करणे;

(तीन) भविष्यकाळात सरकारी नोकरी करण्यास अनर्ह ठरवील अशा प्रकारे बडतर्फ करणे.

(१-अ) नेमणूक करणारे प्राधिकरण किंवा तो ज्याला दुय्यम असेल असे कोणतेही प्राधिकरण किंवा राज्यशासनाने याबाबतीत अधिकार दिले असतील असे कोणतेही इतर प्राधिकरण एखाद्या पोलीस अधिकाऱ्याची –

(अ) वर्तनाची चौकशी चालू असेल किंवा प्रलंबित असेल; किंवा

(ब) कोणत्याही फौजदारीपात्र अपराधासाठी त्याच्याविरुद्ध असलेल्या तक्रारीमध्ये अन्वेषण किंवा न्यायचौकशी चालू असेल, तर अशा अधिकाऱ्याला निलंबनाधीन ठेवू शकेल :

परंतु निलंबनाचा आदेश नेमणूक करणाऱ्या प्राधिकरणापेक्षा कमी दर्जाच्या असणाऱ्या एखाद्या प्राधिकरणाने दिला असेल अशा बाबतीत असे प्राधिकरणाने असा निलंबनाचा आदेश ज्या परिस्थितीमध्ये देण्यात आला असेल त्याबाबत नेमणूक करणाऱ्या प्राधिकरणाला तात्काळ कळविले पाहिजे.

**स्पष्टीकरण** – या पोटनियमाखाली एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला निलंबित करणे ही पोटनियम (१) च्या खंड (अ-२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शिक्षा असल्याचे मानण्यात येणार नाही.

(दोन) एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास फौजदारी आरोपाखाली किंवा अन्य कारणासाठी अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी कोठडीत ठेवण्यात आले असेल, तर त्याला नेमणूक करणाऱ्या प्राधिकरणाने या नियमान्वये निलंबित केले असल्याचे मानण्यात येईल.

(तीन) पोटनियम (१) खाली देण्यात आलेला निलंबनाचा आदेश, कोणत्याही वेळी तो आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाला किंवा ते ज्याला दुय्यम असेल अशा कोणत्याही इतर प्राधिकरणाला मागे घेता येईल.

(२) एखादा पोलीस अधिकारी कोणताही शिस्तभंग किंवा गैरवर्तणूक यासाठी किंवा या अधिनियमाखालील कोणतीही अशी कृती जी त्याला त्याचे कर्तव्य बजावण्यात अपात्र ठरवते मात्र त्यासाठी त्याला निलंबित करणे किंवा बडतर्फ करणे किंवा पदावरून दूर करणे या गोष्टींची आवश्यकता नसते. अशा गोष्टींसाठी दोषी असेल तर त्याला पुढील शिक्षासुद्धा देण्यात येतील :

(एक) समज देणे.

(दोन) ताकीद देणे,

(तीन) जादा कवायत.

(चार) एका महिन्याच्या पगारापेक्षा अधिक नसेल इतका दंड.

(पाच) वेतनवाढ थांबवणे.

(सहा) कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष केल्यामुळे किंवा आदेशाचा भंग केल्यामुळे शासनाची झालेली आर्थिक हानी त्याच्या वेतनातून पूर्णपणे किंवा अंशत: वसूल करणे :

परंतु असे की –

(अ) खंड (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शिक्षा पोलीस शिपायापेक्षा वरच्या दर्जाच्या असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यावर लादण्यात येणार नाही.

(ब) खंड (चार) मध्ये निर्दिष्ट केलेली शिक्षा निरीक्षकावर लादण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण –** या नियमाच्या प्रयोजनासाठी –

(१) ज्या कसूरीसाठी शिक्षा करावयाची आहे तो अपराध करण्याच्या वेळा तो पोलीस अधिकारी वरच्या दर्जाच्या पदावर काम करीत असेल तर तो त्या वरच्या दर्जाचा असल्याचे मानण्यात येईल,

(२) एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने स्थानापन्न म्हणून धारण केलेल्या पदावरून त्याच्या कायमच्या पदावर पदावनती होणे म्हणजे त्याची पदावनती होणे असे होत नाही.

[1](३) परिवीक्षेच्या कालावधीत किंवा त्या कालावधीच्या अखेरीस, नियुक्ती करणाऱ्या प्राधिकरणाने घालून दिलेल्या विनिर्दिष्ट शर्तींमधून उद्‌भवलेल्या कारणांमुळे म्हणजे रिक्त पद नसल्यामुळे, विहित केलेली विशेष अर्हता मिळवण्यात न आल्यामुळे किंवा विहित चाचणीत उत्तीर्ण न झाल्यामुळे परिवीक्षेमधून मुक्त करण्यात येणे याचा अर्थ पदावरून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे असा होत नाही.

परिवीक्षेच्या कालावधीत किंवा त्या कालावधीच्या अखेरीस, कोणत्याही विशिष्ट चुकीसाठी किंवा त्या सेवेसाठी अयोग्य ठरल्यामुळे परिवीक्षेमधून मुक्त करणे म्हणजे पदावरून काढणे होय.

४. (१) नियम ३ च्या पोटनियम (१) चे खंड (अ-१), (अ-२), एक (एक-अ), (दोन) व (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शिक्षा,

१. दि. २४ एप्रिल १९६७ च्या अधिसूचनेद्वारे घातला.



कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याची त्याच्या वर्तणुकीसाठी विभागीय चौकशी करण्यात आल्याखेरीज आणि उक्त शिक्षा देणारा आदेश का काढण्यात आला त्याची कारणे चौकशीच्या टिप्पणीवर लिहून तीवर त्याची सही झालेली असल्याखेरीज लादण्यात येणार नाही.

SCN

(२) पूर्वगामी तरतुदींना बाध न आणता, नियम ३ च्या पोटनियम (२) च्या खंड (एक), (दोन), पाच आणि (सहा) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शास्ती लादणारा कोणताही आदेश, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यावर त्याची जे निवेदन करण्याची इच्छा असेल असे निवेदन करण्याची त्यास संधी न देता आणि असे निवेदन विचारात न घेता काढण्यात येणार नाही. परंतु या पोटनियमाच्या कोणत्याही आवश्यकता पूर्ण करणे अडचणीचे असेल आणि संबंधित अधिकाऱ्यावर कोणताही अन्याय न करता त्या सोडून देता येत असतील, तर पुरेशा कारणांसाठी ती कारणे लेखी नमूद करून त्या सोडून देता येतील.

**टीप –** पदावरून दूर करण्याचा आदेश काढण्यापूर्वी करावयाची विभागीय चौकशीची संपूर्ण प्रक्रिया, नियम ३ च्या स्पष्टीकरणाच्या परिच्छेद (४) मध्ये वर्णन केलेल्या परिस्थितीत परिवीक्षाधीन अधिकाऱ्याला पदावरून मुक्त करण्याच्या बाबतीत अनुसरण्याची आवश्यकता नाही. अशा बाबतीत, त्याला पदावरून मुक्त करण्याची कारणे सांगितल्यानंतर अशा प्रकारे मुक्त का करण्यात येऊ नये हे लेखी मांडण्याची संधी त्याला देणे पुरेसे ठरेल आणि त्याचे उत्तर असल्यास ते आदेश काढण्यापूर्वी योग्य रीतीने विचारात घेण्यात येईल.

५. या नियमांच्या अनुसूची १ मधील स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना त्याच्या स्तंभ ३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रकारची शिक्षा तिच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांवर त्याच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्बंधांना अधीन राहून लादण्याचा अधिकार असेल.

६. नियम ३ च्या पोटनियम (१) च्या खंड (तीस), (अ-२), (एक), (एक-अ), (दोन), आणि पोटनियम (२) चे खंड (चार), (पाच) व (सहा) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शिक्षा ज्याच्यावर लादण्यात आली असेल अशा प्रत्येक अधिकाऱ्याला अशा शिक्षेच्या आदेशाविरुद्ध नियम ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाकडे अपील करण्याचा हक्क असेल.

(समज देणे, ताकीद देणे, जादा कवायत)

७. नियम ३ च्या पोटनियम (२) च्या खंड (एक) ते (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शिक्षा लादणाऱ्या आदेशाविरुद्ध अपील करता येणार नाही.

८. अपील करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने ते स्वतंत्रपणे आणि आपल्या स्वत:च्या नावाने केले पाहिजे.

९. (१) या नियमांच्या अनुसूची ११ च्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली प्राधिकरणे ही अशी प्राधिकरणे असतील की ज्यांच्याकडे त्या सूचीच्या स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संबंधित अधिकाऱ्याने काढलेल्या आदेशा विरुद्ध अपील करावयाची प्राधिकरणे असतील.

(२) * * * (वगळला)

(३) या नियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही जेव्हा राज्यशासन किंवा महानिरीक्षक याखेरीज इतर अपील प्राधिकरणाकडे अपील करण्यात आले असेल तेव्हा महानिरीक्षकास लवकर न्याय मिळावा यासाठी किंवा अपील करणारा किंवा साक्षीदार किंवा संबंधित अधिकारी यांच्या सर्वसाधारण सोयीसाठी, एकतर स्वत:हून किंवा अन्य कारणाने असे अपील निकालात काढण्यासाठी ते अपील दाखल करून घेण्यास सूक्ष्म असणाऱ्या इतर कोणत्याही अपील प्राधिकरणाकडे हस्तांतरित करता येईल.

१०. या नियमांद्वारे दाखल करण्यात आलेल्या प्रत्येक अपिलात अपील करणारा ज्यांचा आधार घेणारा असेल ती सर्व महत्त्वपूर्ण कथने आणि मुद्दे यांचा समावेश असावा आणि त्याला कोणतीही असभ्य किंवा अयोग्य भाषा वापरण्यात येऊ नये, तसेच ती परिपूर्ण असावी. ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल त्याची प्रत त्यासोबत जोडण्यात यावी आणि ती अपील करणारा ज्याच्या नियंत्रणाखाली काम करतो किंवा केले होते त्या कार्यक्रम प्रमुखामार्फत ती सादर करण्यात यावी.

११. ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात असेल तो आदेश अपील करणाऱ्याला कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत प्रत्येक अपील करण्यात आले पाहिजे. परंतु अपील प्राधिकरणाला त्याच्या स्वाधिकाराने आणि योग्य कारण दर्शवून हा कालावधी सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल.

१२. जर शिक्षा अपील करण्यायोग्य नसेल, तर अपील फेटाळण्यात येईल किंवा जर तो यात यापूर्वी नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही आवश्यक



गोष्टी पूर्ण करीत नसेल तर ते रोखून ठेवता येईल.

१३. अपील रोखून ठेवण्यात आले असेल अशा प्रत्येक बाबतीत, अपील करणाऱ्याला ती गोष्ट आणि त्याबाबतची कारणेही कळविण्यात येतील.

१४. अपील प्राधिकरणाने अपील रोखून ठेवण्याच्या बाबतीत अपील होऊ शकणार नाही.

परंतु, जर नियम १० च्या तरतुदींचे पालन न केल्यामुळे अपील रोखून धरण्यात आले असेल तर, ते रोखून धरण्याची कारणे अपील करणाऱ्याला कळविण्यात आल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत त्या नियमाच्या तरतुदींचे पालन होईल अशा नमुन्यात पुन्हा सादर करता येईल.

१५. अपील प्राधिकरण –

(अ) आदेश ज्यावर आधारलेला आहे ती तथ्ये प्रस्थापित झाली आहेत;

(ब) प्रस्थापित तथ्ये ही शिक्षा लादण्यासाठी भक्कम आधार देणारी आहेत;

(क) शास्ती अधिक, पुरेशी किंवा अपुरी आहे काय? या गोष्टी विचारात घेईल आणि त्याला आवश्यक वाटले तर, आदेश काढणाऱ्या प्राधिकरणाला विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या एका किंवा अनेक मुद्द्यांवर आणखी चौकशी करण्यास फर्मावील आणि त्यानंतर ते त्याला योग्य आणि न्याय्य वाटेल असा आदेश काढील. त्यात दिलेली शिक्षा वाढविणे किंवा अधिक कडक शिक्षा फर्मावणे या गोष्टींचाही समावेश असू शकेल.

परंतु शिक्षा वाढविणे किंवा यथास्थिती अधिक कडक शिक्षा देणे याबाबतची कारणे दाखवा नोटीस दिल्याशिवाय आणि दर्शविण्यात आलेले कोणतेही कारण विचारात घेतल्याशिवाय अपिलात अशी कोणतीही शिक्षावाढ किंवा कडक शिक्षा देता येणार नाही.

१६. ज्या प्राधिकरणाच्या आदेशावर या नियमान्वये अपील करण्यात आले असेल त्याने अपील प्राधिकरणाने काढलेला कोणताही आदेश अमलात आणला पाहिजे.

१६-अ. पोलीस महानिरीक्षकाला किंवा विभागीय चौकशीचा आदेश देण्याचा अधिकार असलेल्या अन्य प्राधिकरणाला योग्य व पुरेशी कारणे लेखी नमूद करून त्यासाठी एखाद्या पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध या नियमांखाली प्रलंबित असलेली कार्यवाही एका अधिकाऱ्याकडून दुसऱ्या अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्याचा आदेश देता येईल. ज्या चौकशी अधिकाऱ्याकडे

ती चौकशी हस्तांतरित केली असेल ते ती नव्याने सुरू करील.

१७. (१) पोलीस महानिरीक्षकाला एकतर स्वत:हून किंवा अन्य प्रकारे ज्यामध्ये त्याला कनिष्ठ असलेल्या प्राधिकाऱ्याने या अधिनियमान्वये त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आदेश (मूळ आदेश किंवा अपिलातील आदेश) काढला असेल आणि त्या विरुद्ध त्याच्याकडे किंवा त्याला दुय्यम असलेल्या प्राधिकाऱ्याकडे अपील होऊ शकत असेल; परंतु या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अपील करण्यात आले नसेल किंवा असे अपील करण्यात आले असेल तर अपील प्राधिकरणाने अपिलाचा निर्णय केला असेल, तर असे प्रकरण मागवून घेता येईल आणि त्याची तपासणी करता येईल आणि –

(अ) तो आदेश कायम करता येईल, सुधारता येईल किंवा फिरवता येईल किंवा

(ब) त्या बाबतीत आणखी चौकशी करण्यात यावी असे निदेश देता येतील किंवा

(क) आदेशाद्वारे लादलेली शिक्षा कमी करता किंवा वाढविता येईल किंवा

(ड) त्या प्रकरणात त्याला योग्य वाटेल असा इतर कोणताही आदेश देता येईल.

परंतु अशा कोणत्याही आदेशाद्वारे लादलेली शिक्षा वाढविण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल किंवा सोडून देण्याचा आदेश रद्द करून शिक्षा लादावयाची असेल तर संबंधित पोलीस अधिकाऱ्याला प्रस्तावित शिक्षावाढीच्या किंवा शिक्षेच्या विरोधात कारणे दाखविण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

१९. (१) शिक्षा लादण्याचा आदेश देण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याच्या शिक्षेविरुद्ध अपील करता येत नसेल तर त्याचा निकटतम प्राधिकाऱ्याच्या शिक्षेविरुद्ध अपील करता येत नसेल तर त्याचा निकटतम वरिष्ठ अधिकारी स्वत:हून किंवा अन्य प्रकारे अशा प्राधिकरणाने ज्यामध्ये आदेश दिला असेल असे प्रकरण मागवू शकेल आणि –

(अ) तो आदेश कायम करू शकेल, त्यात फेरबदल करू शकेल किंवा तो फिरवू शकेल किंवा

(ब) त्या प्रकरणात पुढील चौकशी करण्यात यावी असा निदेश देऊ शकेल किंवा



(क) त्या आदेशाद्वारे लादलेली शिक्षा कमी करू शकेल किंवा वाढवू शकेल किंवा

(ड) त्या प्रकरणात त्याला योग्य वाटतील असे आदेश देऊ शकेल.

परंतु अशा कोणत्याही आदेशाद्वारे लादलेली शिक्षा वाढविण्याचा प्रस्ताव असेल तेव्हा संबंधित पोलीस अधिकाऱ्याला प्रस्तावित शिक्षावाढीविरुद्ध कारणे दाखविण्याची संधी देण्यात येईल.

(२) पुनर्विलोकनासाठी करावयाचा प्रत्येक अर्ज ज्या आदेशाविरुद्ध तक्रार करण्यात आली असेल अशा आदेशाची माहिती अर्जदाराला दिल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत करण्यात आली पाहिजे. पुनर्विलोकन करणाऱ्या अधिकाऱ्याला स्वत:हून योग्य कारणे दर्शवून त्यासाठी हा कालावधी शिथील करता येईल.

२०. (१) या नियमांशी मिळेतजुळते असणारे आणि हे नियम अमलात येण्याच्या निकटपूर्वी अमलात असलेले कोणतेही नियम याद्वारे निरसित करण्यात येत आहेत.

परंतु अशा प्रकारे निरसित करण्यात आलेल्या नियमाद्वारे काढलेला कोणताही आदेश किंवा केलेली कोणतीही कृती ही या नियमांच्या अनुरूप तरतुदींखाली करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(२) हे नियम राज्याच्या हैदराबाद, विदर्भ, सौराष्ट्र आणि कच्छ या क्षेत्रांमध्ये सुरू झाल्यानंतर पुढील नियम ते पोलीस निरीक्षकाच्या आणि त्याच्यापेक्षा खालच्या दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्याला जितपत लागू असतील तितपत निरसित झालेले असतील, ते नियम म्हणजे –

(१) हैदराबाद सिव्हिल सर्व्हिसेस (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) नियम, १९५५ हे राज्याच्या हैदराबाद क्षेत्रामध्ये अमलात असतील त्याप्रमाणे;

(२) मध्यप्रांत व वऱ्हाड पोलीस विनियमन, राज्याच्या विदर्भ क्षेत्रात जसे अमलात असतील त्याप्रमाणे;

(३) पूर्वीचे गव्हर्नमेंट ऑफ सौराष्ट्र, गृह विभाग, अधिसूचना क्र. एच/१३-५, दि. १९ ऑगस्ट, १९५४ यामध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिकाऱ्यांच्या पोलीस दल सदस्यांचे विभागीय शिक्षेसंबंधीचे नियम आणि

(४) कच्छ राज्याच्या मुख्य आयुक्ताने केलेले आणि मुख्य आयुक्त कच्छ, अधिसूचना क्र. एस – १८०/५२, दिनांक ५ नोव्हेंबर, १९५४ मध्ये प्रसिद्ध केलेले नियम याद्वारे निरसित होतील.

परंतु अशा प्रकारे निरसित करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींद्वारे करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ती जितपत या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसेल तितपत या नियमांच्या तरतुदींनुसार करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

□□□



## २. विनिर्दिष्ट अधिकाऱ्यांचे अधिकार

[नियम ५ पाहा]

| शिक्षा देण्याचा प्राधिकार असलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम<br>१ | ज्याला शिक्षा करता येईल त्या अधिकाऱ्याचा दर्जा<br>२ | लादता येईल अशा शिक्षेचा प्रकार<br>३ | स्तंभ १ मधील विनिर्दिष्ट अधिकारी ज्या निर्बंधांना अधीन राहून शिक्षा देण्यास प्राधिकृत असेल ते निर्बंध (असल्यास)<br>४ |
|---|---|---|---|
| १. पोलीस महानिरीक्षक | महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम ज्यांना प्रयुक्त आहे असे सर्व अधिकारी | स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्बंधांना अधीन राहून नियम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शिक्षा. | नियम ३ च्या पोटनियम (२) च्या परंतुकाच्या खंड (अ) मध्ये घालून दिलेले निर्बंध. |
| २. पोलीस उपमहानिरीक्षक | (१) महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ ज्यांना प्रयुक्त आहे असे निरीक्षक वगळून सर्व अधिकारी.<br>(२) निरीक्षक. | स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निर्बंधांना अधीन राहून नियम ३ मधील सर्व शिक्षा.<br>समज देणे आणि ताकीद देणे. | (अ) नियम ३ च्या पोटनियम (२) च्या परंतुकाच्या खंड (अ) मध्ये घालून दिलेले निर्बंध.<br>(ब) पोलीस अधिकाऱ्याला ज्याने नियुक्त केले असेल त्याच्यापेक्षा कमी दर्जाचा असेल असा कोणताही प्राधिकारी सक्तीची सेवानिवृत्ती, कामावरून काढणे किंवा बडतर्फ करणे या शिक्षा देणार नाही. |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| ३. पोलीस अधिक्षक | उपनिरीक्षक, सहाय्यक उपनिरीक्षक, हवालदार व पोलीस शिपाई. | स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निर्बंधांना अधीन राहून नियम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शिक्षा. | (अ) पोटनियम (एक-अ) च्या खंड (एक) व नियम (३) च्या पोटनियम (२) च्या परंतुकाचा खंड (अ) मध्ये घालून दिलेले निर्बंध.<br>(ब) सक्तीची सेवानिवृत्ती काढून टाकणे व बडतर्फ करणे या शिक्षा, त्या पोलीस अधिकाऱ्याची नेमणूक करणाऱ्या प्राधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाच्या प्राधिकाऱ्याकडून देण्यात येणार नाही. |
| ४. सहाय्यक पोलीस अधिक्षक किंवा पोलीस | (१) हवालदार | समज व ताकीद, दंड देणे, वेतनवाढ थांबविणे आणि दर्जा, श्रेणी किंवा वेतन यात घट करणे. | (अ) अधिनियमाच्या कलम ८ च्या पोटकलम (३) अन्वये पोलीस अधिक्षकाने शिक्षा देण्याचे अधिकार दिले असतील या शर्तीस अधीन राहून.<br>(ब) नियम ३ च्या पोटनियम (२) च्या परंतुकाच्या खंड (अ) मध्ये घालून दिलेल्या निर्बंधास अधीन राहून.<br>(क) दंडाची शिक्षा, वेतनवाढ थांबवणे किंवा वेतनात कपात करणे याच्या परिणामी होणारी आर्थिक हानी एकूण २४ रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.<br>(ड) दर्जा किंवा श्रेणी यामध्ये घट करण्याचा |
| | (२) पोलीस शिपाई. | समज व ताकीद, जादा कवायत, दंड, वेतनवाढ रोखणे आणि वेतनात कपात. | |



| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| | | | कालावधी एका वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी असणार नाही.<br>(ई) हवालदार, हवालदारासाठीच्या दर्जामधील सर्वांत खालच्या दर्जावर असेल तर घट ही हवालदाराच्या पदावर असेल आणि इतर बाबतीत त्याने धारण केलेल्या दर्जाच्या खालच्या दर्जावर असेल.<br>(अ) ही शिक्षा देण्याचे अधिकार<br>या अधिनियमाच्या कलम ८ च्या पोटकलम (३) अन्वये पोलीस अधिक्षकाने सोपवले असतील या शर्तीस अधीन राहून.<br>(ब) दंड, वेतनवाढ रोखणे किंवा वेतनात घट करणे या शिक्षांमुळे होणारी आर्थिक हानी एकूण रु. २४ पेक्षा अधिक असणार नाही. |

**दोन— बृहन्मुंबईतील किंवा या अधिनियमाच्या कलम ७ अन्वये ज्यासाठी पोलीस आयुक्ताची नियुक्ती करण्यात आ... असेल अशा क्षेत्रातील पोलीस अधिकारी (पोलीस मोटार वाहन यंत्रणा किंवा पोलीस बिनतारी यंत्रणा यांसह)**

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १. पोलीस महानिरीक्षक | महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम, १९५६ ज्यांना लागू असतील असे सर्व अधिकारी. | स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्बंधांना अधीन राहून नियम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शिक्षा. | नियम ३ च्या पोटनियम (२) च्या परंतुकाच्या खंड (अ) मध्ये घालून दिलेले सर्व निर्बंध. |
| २. पोलीस आयुक्त, मुंबई. | महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम, १९५६ ज्यांना लागू असतील असे सर्व अधिकारी. | स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्बंधाना अधीन राहून नियम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शिक्षा. | नियम ३ च्या पोटनियम (२) च्या खंड (अ) मध्ये घालून दिलेले सर्व निर्बंध (ब) सक्तीची सेवानिवृत्ती किंवा पदावरून दूर करणे किंवा बडतर्फ करणे या शिक्षा ज्याने पोलीस अधिकाऱ्याची नेमणूक केली असेल त्यापेक्षा खालच्या दर्जाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून लादण्यात येणार नाहीत. |
| ३. पोलीस आयुक्त, पुणे व नागपूर. | (१) ज्यांना मुंबई पोलीस, (शिक्षा व अपीले) नियम, १९५६ लागू असतील असे पोलीस निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे सर्व अधिकारी. | स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्बंधाना अधीन राहून नियम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शिक्षा. | नियम ३ च्या पोटनियम (२) खालील परंतुकामधील निर्बंधांना अधीन राहून पोलीस अधिकाऱ्याची ज्याच्याकडून नियुक्ती झाली होती अशा अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या प्राधिकाऱ्याकडून सक्तीची सेवानिवृत्ती, पदावरून |



| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| | | | दूर करणे किंवा बडतर्फ करणे ही शिक्षा देण्यात येणार नाही. |
| ४. पोलीस उपायुक्त. | (२) निरीक्षक. ज्यांना महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम, १९५६ लागू होतात असे निरीक्षक वगळून सर्व अधिकारी. | सूचना व ताकीद स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्बंधास अधीन राहून नियम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शिक्षा. | (अ) नियम ३ च्या पोटनियम. (१अ) च्या खंड (एक) मध्ये आणि पोटनियम (२) च्या परंतुकाच्या खंड (अ) मध्ये घालून दिलेले सर्व निर्बंध. (ब) सक्तीची सेवानिवृत्ती, पदावरून दूर करणे किंवा बडतर्फी या शिक्षा, पोलीस अधिकाऱ्याची ज्याने नियुक्ती केली असेल त्या अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्याकडून लादण्यात येणार नाही. (क) नियम ३ च्या पोटनियम (१) मध्ये आणि पोटनियम (२) च्या खंड (चार) मध्ये नमूद केलेली शिक्षा पोलीस अधीक्षकाच्या नियंत्रणास अधीन राहून देण्यात येईल. |
| ५. सहाय्यक पोलीस आयुक्त. | (१) हवालदार. | समज व ताकीद देणे, दंड, वेतनवाढ थांबविणे, दर्जात किंवा वेतनात घट करणे. | (अ) अधिनियमाच्या कलम ११, पोटकलम (२) अन्वये शिक्षा देण्याचा अधिकार पोलीस आयुक्ताकडून देण्यात येईल या शर्तीस अधीन |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| | | | राहून.<br>(ब) दंड, वेतन वाढ थांबवणे, वेतनात घट, यां शिक्षांमुळे होणारी आर्थिक हानी एकूण २४ रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.<br>(क) दर्जा किंवा श्रेणी यांमधील घट ही एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी असणार नाही.<br>(ड) हवालदाराची सर्वांत खालची श्रेणी धारण केली असेल तर, अशा हवालदाराच्या बाबतीत, पोलीस शिपायाच्या पदावर श्रेणीत पदावनती आणि इतर बाबतीत, त्याने धारण केलेल्या श्रेणीपेक्षा एक श्रेणी खालच्या पदावर पदावनती.<br>(ई) दंड व घट ही पोलीस आयुक्ताच्या नियंत्रणास अधीन असेल. |
| | (२) पोलीस शिपाई. | समज व ताकीद, जादा कवायत, दंड, वेतनवाढ थांबविणे आणि वेतनात कपात. | (अ) या अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (२) अन्वये पोलीस आयुक्ताने शिक्षा देण्याचा अधिकार सोपवलेला असेल या शर्तीस अधीन राहून<br>(ब) दंड, वेतनवाढ थांबविणे किंवा वेतनात कपात या शिक्षांमुळे होणारी आर्थिक हानी एकूण रु. |



| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| | | | २४ पेक्षा अधिक असणार नाही.<br>(क) दंड आणि घट या शिक्षा पोलीस आयुक्ताच्या नियंत्रणाच्या अधीनतेने लादण्यात येतील. |

**तीन— पोलीस मोटार परिवहन यंत्रणा किंवा पोलीस बिनतारी यंत्रणा यांसाठी नियुक्त केलेले आणि जिल्ह्यामध्ये पदनियुक्त केलेले पोलीस अधिकारी**

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १. पोलीस महानिरीक्षक | महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम, १९५६ ज्यांना लागू आहेत असे सर्व अधिकारी | स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निर्बंधास अधीन राहून नियम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शिक्षा. | नियम ३ च्या पोटनियम (२) च्या परंतुकाच्या खंड (अ) मध्ये घालून दिलेल्या निर्बंधास अधीन राहून. |
| २. पोलीस उपमहानिरीक्षक | (१) महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम, १९५६ ज्यांना लागू आहेत असे निरीक्षकाव्यतिरिक्त सर्व अधिकारी. | स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निर्बंधास अधीन राहून नियम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शिक्षा. | (अ) नियम ३ च्या पोटनियम (२) मधील परंतुकाच्या खंड (अ) मध्ये घालून दिलेले सर्व निर्बंध.<br>(ब) सक्तीची सेवानिवृत्ती, पदावरून दूर करणे किंवा बडतर्फ करणे या शिक्षा त्या पोलीस अधिकाऱ्याला नियुक्त करणाऱ्या अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्याकडून लादण्यात येणार नाहीत. |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| ३. पोलीस अधीक्षक, पोलीस मोटार परिवहन यंत्रणा, किंवा पोलीस अधीक्षक, पोलीस बिनतारी यंत्रणा किंवा मुफसल मधील कोणताही पोलीस अधीक्षक. | (२) निरीक्षक, उपनिरीक्षक, सहायक उपनिरीक्षक, हवालदार व पोलीस शिपाई. | समज व ताकीद. स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निर्बंधास अधीन राहून नियम ३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व शिक्षा. | (अ) नियम ३ च्या पोटनियम (१अ) च्या खंड (एक) मध्ये आणि पोटनियम (२) च्या परंतुकाच्या खंड (अ) मध्ये घालून दिलेले निर्बंध.<br>(ब) सक्तीची सेवानिवृत्ती, पदावरून दूर करणे किंवा बडतर्फ करणे या शिक्षा त्या पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती करणाऱ्या प्राधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाच्या प्राधिकाऱ्याकडून लादण्यात येणार नाही. |
| ४. सहायक पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उपअधीक्षक, पोलीस मोटार परिवहन यंत्रणा किंवा पोलीस सहायक अधीक्षक किंवा पोलीस उपअधीक्षक बिनतारी यंत्रणा किंवा प्रकरणपरत्वे सहायक किंवा उप-पोलीस अधीक्षक, मुफसल. | (१) हवालदार | समज व ताकीद देणे, दंड, वेतनवाढ थांबविणे आणि दर्जा किंवा वेतन कमी करणे. | (अ) या अधिनियमाच्या कलम ८ अ च्या पोटकलम (२) अन्वये किंवा यथास्थिती, कलम ८ च्या पोटकलम (३) अन्वये पोलीस अधीक्षकाने शिक्षा लादण्याचे अधिकार सोपविलेले असतील या शर्तीस अधीन राहून.<br>(ब) दंड, वेतनवाढ थांबवणे, वेतनात कपात यामुळे होणारी आर्थिक हानी एकूण २४ रुपयांपेक्षा अधिक नसेल.<br>(क) श्रेणी किंवा दर्जा यातील घट ही एक महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी असणार नाही.<br>(ड) हवालदाराने धारण केलेला दर्जा |



| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| | (२) पोलीस शिपाई | समज व ताकीद देणे, जादा कवायत, दंड, वेतन वाढ थांबविणे आणि वेतन कपात. | हवालदाराच्या श्रेणीतील सर्वात खालचा असेल तर पोलीस शिपायाच्या पदावर व इतर बाबतीत त्याने धारण केलेल्या श्रेणीपेक्षा एक श्रेणी खाली यानुसार घट करण्यात येईल.<br>(अ) या अधिनियमाच्या कलम ८ अ च्या पोटकलम (२) अन्वये किंवा यथास्थिती कलम ८ च्या पोटकलम (३) अन्वये शिक्षा देण्याचा अधिकार पोलीस अधीक्षकाने सोपवला असेल या शर्तीस अधीन राहून<br>(ब) दंड, वेतनवाढ थांबविणे, किंवा वेतनात कपात यांमुळे होणारी आर्थिक हानी एकूण २४ रुपयांपेक्षा अधिक असणार नाही. |
| **पाच— रेल्वे पोलीस अधिकारी** | | | |
| १. पोलीस महानिरीक्षक | महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम, १९५६ ज्यांना लागू होतात असे सर्व अधिकारी | स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्बंधांना अधीन राहून नियम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शिक्षा | नियम ३ च्या पोटनियम (२) च्या परंतुकाच्या खंड (अ) मध्ये घालून दिलेले निर्बंध. |
| २. पोलीस उपमहानिरीक्षक | (१) महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम, १९५६ ज्यांना लागू | स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निर्बंधास अधीन राहून नियम ३ मध्ये | (अ) नियम ३ च्या पोटनियम (२) च्या परंतुकाच्या खंड (अ) मध्ये घालून दिलेले निर्बंध. |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| | होतात असे निरीक्षक वगळून सर्व अधिकारी | विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शिक्षा. | (ब) सक्तीची सेवानिवृत्ती, पदावरून दूर करणे किंवा बडतर्फ करणे या शिक्षा त्या पोलीस अधिकाऱ्याला नियुक्त करणाऱ्या प्राधिकाऱ्यापेक्षा खालच्या दर्जाच्या प्राधिकाऱ्याकडून लादण्यात येणार नाही. |
| ३. पोलीस अधीक्षक, रेल्वे | (२) निरीक्षक–<br>उपनिरीक्षक, सहायक उपनिरीक्षक, हवालदार व पोलीस शिपाई. | समज व ताकीद देणे. स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निर्बंधास अधीन राहून नियम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शिक्षा. | (अ) नियम ३ च्या पोटनियम (१अ) च्या खंड (एक) मध्ये आणि नियम ३ च्या पोटनियम (२) च्या परंतुकाच्या खंड (अ) मध्ये घालून दिलेले निर्बंध.<br>(ब) सक्तीची सेवानिवृत्ती, पदावरून दूर करणे, बडतर्फी या शिक्षा त्या पोलीस अधिकाऱ्याला नियुक्त करणाऱ्या प्राधिकाऱ्यापेक्षा खालच्या दर्जाच्या प्राधिकाऱ्याकडून लादण्यात येणार नाहीत. |
| ४. पोलीस सहायक अधीक्षक किंवा पोलीस उपअधीक्षक, रेल्वे. | (१) हवालदार... | समज, ताकीद देणे, दंड, वेतनवाढ थांबविणे, आणि दर्जा, श्रेणी किंवा वेतन यात कपात. | (अ) या अधिनियमाच्या कलम २२-अ च्या पोटकलम (५) अन्वये पोलीस अधीक्षकाने शिक्षा देण्याचे अधिकार सोपवले असतील या शर्तीस अधीन राहून.<br>(ब) दंड, वेतनवाढ थांबविणे, किंवा वेतनात |



| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| | | | कपात करणे यामुळे होणारी आर्थिक हानी एकूण २४ रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.<br>(क) दर्जा किंवा श्रेणीतील घट ही एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी असणार नाही.<br>(ड) हवालदाराने धारण केलेली श्रेणी ही हवालदाराच्या दर्जामधील सर्वात खालची असेल तर घट ही पोलीस शिपायाच्या दर्जावर देण्यात येईल. इतर बाबतीत ती, धारण केलेल्या पदाच्या खालच्या पदावर देण्यात येईल. |
| | (२) पोलीस शिपाई | समज ताकीद देणे, जादा कवायत, दंड वेतनवाढ थांबविणे आणि वेतनात घट. | (अ) या अधिनियमाच्या कलम २२अ च्या पोटकलम (५) अन्वये पोलीस अधीक्षकाने शिक्षा देण्याचे अधिकार सोपविलेले असतील या शर्तीस अधीन राहून.<br>(ब) दंड, वेतनवाढ थांबविणे, किंवा वेतनात घट या शिक्षांमुळे होणारी आर्थिक हानी एकूण २४ रुपयांपेक्षा अधिक असणार नाही. |

□□□

# ३. महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम, १९५६

(नियम ९ पाहा)

| शिक्षा देणारे प्राधिकरण (१) | अपिल प्राधिकरण (२) |
|---|---|
| एक - जिल्ह्यांतील पोलीस अधिकारी | |
| १. पोलीस महानिरीक्षक | राज्य सरकार |
| २. पोलीस उपमहानिरीक्षक | पोलीस महानिरीक्षक |
| ३. पोलीस अधीक्षक | पोलीस उपमहानिरीक्षक |
| ४. पोलीस सहाय्यक अधीक्षक किंवा उपनिरीक्षक | पोलीस महानिरीक्षक |
| दोन– बृहन्मुंबईमधील पोलीस अधिकारी (पोलीस मोटार वाहन यंत्रणा किंवा बिनतारी पोलीस यंत्रणा यांसह) किंवा अधिनियमाच्या कलम ७ अन्वये पोलीस आयुक्ताची ज्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे अशा कोणत्याही क्षेत्रातील पोलीस अधिकारी | |
| १. पोलीस महानिरीक्षक | राज्य सरकार |
| २. पोलीस आयुक्त | राज्य सरकार |
| ३. पोलीस उपायुक्त किंवा सहाय्यक पोलीस आयुक्त | पोलीस महानिरीक्षक |
| तीन - पोलीस मोटार परिवहन यंत्रणा किंवा बिनतारी पोलीस यंत्रणा यांसाठी नियुक्त केलेले आणि जिल्ह्यांमध्ये पाठविलेले पोलीस अधिकारी | |
| १. पोलीस महानिरीक्षक | राज्य सरकार |
| २. पोलीस उपमहानिरीक्षक | पोलीस महानिरीक्षक |
| ३. पोलीस अधीक्षक, पोलीस मोटार परिवहन यंत्रणा किंवा पोलीस बिनतारी यंत्रणा किंवा पोलीस अधिक्षक, -मुकसल- | पोलीस उपमहानिरीक्षक |
| ४. पोलीस सहाय्यक अधिक्षक किंवा उप अधिक्षक, पोलीस मोटार परिवहन यंत्रणा किंवा पोलीस बिनतारी यंत्रणा,– | पोलीस उपमहानिरीक्षक |
| चार– पोलीस प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेत असलेले किंवा सेवेत असलेले पोलीस अधिकारी | |
| १. पोलीस महानिरीक्षक | राज्य सरकार |
| २. पोलीस उपमहानिरीक्षक | पोलीस महानिरीक्षक |
| ३. पोलीस प्रशिक्षण महाविद्यालये किंवा शाळेचे प्राचार्य | पोलीस उपमहानिरीक्षक |
| पाच– रेल्वे पोलीस अधिकारी | |
| १. पोलीस महानिरीक्षक | राज्य सरकार |
| २.पोलीस उपमहानिरीक्षक | पोलीस उपमहानिरीक्षक |
| ३. पोलीस अधिक्षक, रेल्वे | पोलीस उपमहानिरीक्षक |
| ४. सहाय्यक पोलीस अधिक्षक किंवा पोलीस उपअधिक्षक, रेल्वे | पोलीस उपमहानिरीक्षक |

□□□